सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
इंदिरा गांधी स्टेडियम,चार पुतळा पाठीमागे,सोलापूर -४१३००१
क्रीडा कार्यालय सोलापूर,दुरध्वनी क्रं.०२१७-२९९०६०४
Mail ID : smcsportsoffice2025@gmail.com

# Expression of Interest (EOI)

## अटी व शर्ती (Terms & Conditions)

**सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालयाकडील स्वा.वीर सावरकर जलतरण तलाव हे ३६ महिने कालावधीकरीता भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात येत आहे. इच्छुक अनुभवी व शासनाकडील नोंदणीकृत एजन्सी कडून Expression of Interest (EOI) मागविणेत येत आहे. तसेच प्राप्त Expression of Interest (EOI) चे परिक्षण अंतिम करणेकामी गठित समिती मार्फत खालील मुद्दयावर आधारीत परिक्षण करुन मक्तेदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.**

1) प्राप्त Expression of Interest (EOI) ची प्राथमिक छाननी .
2) तांत्रिक मुल्यांकन.
3) संस्थांच्या अनुभव व क्षमतेचे परिक्षण.
4) प्रस्तावित माध्यमांचे तांत्रिक तपशील तपासणे.
5) जलतरण तलाव चालविणेबाबत अनुभवी शहानीशा करणे.
6) अंतिम पात्र व शिफारस योग्य संस्थांची निवड यादी तयार करणे.
7) तसेच उपरोक्त मुद्यांच्या पडताळणी अंती खालील आधारावर समितीकडून गुणांकन करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | देखभाल व दुरुस्ती | 10 | |
| 2 | भांडवल व गुंतवणुक | 20 | |
| 3 | नुतनीकरणासाठी गुंतवणुक | 20 | |
| 4 | अनुभव (किमान पाच वर्ष) | 20 | |
| 5 | आर्थिक परतावा | 30 | |

**सदरील Expression of Interest (EOI) मध्ये सहभागी होण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणे बंधनकारक राहिल.**

**१. सोबत सादर करावयाचे कागदपत्रे.**

१. संस्थेची नोंदणी, PAN, GST
२. अनुभव प्रमाणपत्र
३. प्रस्तावित मनुष्यबळ यादी
४. आर्थिक स्थिती /ITR
५. मागील प्रकल्पांचे कार्यप्रमाणपत्रे
६. **Expression of Interest (EOI) मध्ये सहभागी होणेकामी र.रु.५,०००/- इतके प्रवेश शुल्क तसेच र.रु.५०,०००/- डिमांड ड्राफ्ट .**

**२.स्विकारायचे किमान दायित्व.**

१. निवड झालेली एजन्सी जलतरण तलाव स्वतःच्या खर्चाने स्वतंत्रपणे चालवेल.
२. देखभाल, दुरुस्ती, फिल्टर पंप, मोटार, पंप, पाणी पाईपलाइन, लाईटिंग, इलेक्ट्रिक पॅनल्स,वीज बिल, मनुष्यबळ, रसायने , क्लोरिन गॅस, सुरक्षा, स्वच्छता, उपकरणे इ. सर्व खर्च पूर्ण जबाबदारी एजन्सीची राहिल.
३. जलतरण तलावाची नियमित स्वच्छता व पाण्याची गुणवत्ता नियंत्रण

४.एजन्सीने म.न.पा.ला दरमहा दरमहा सादर केलेले रकमेचे भाडे महिन्याचे १ ते १० तारखेपर्यंत जमा करणे आवश्यक.

५.भाडे उशीरा भरल्यास म.न.पा नियमांनुसार दंड/व्याज आकारले जाईल.

६.तलावाच्या संचालनादरम्यान आपघात झाल्यास / दुर्घटना झाल्यास संपूर्ण जबाबदारी एजन्सीची राहील. तसेच संबंधीतास नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी एजन्सी यांची राहिल.

७. सर्व कर्मचारी व वापरकर्त्यांचे विमा (Public Liability Insurance) एजन्सीकडून विमा उतरवणे बंधनकारक राहिल.

८. एजन्सीने तलाव पोटभाड्याने / पोट मक्त्याने देता येणार नाही.

९. सदर अटी व शर्तीमध्ये वाढ किंवा कमी करण्याचा अधिकार मा.आयुक्त,सो.म.पा यांना राहिल.

आशिषलोकरे

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर